|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२२-२३/ डी.ओ. 5 / 234 /२०२२ दिनांक : 04-08-2022

प्रति,

मा. प्राचार्य/मा.संचालक
राष्ट्रीय सहकारी शिक्षण प्रसारक मंड्ळाचे, नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चाळीसगांव
ता. चाळीसगाव जि. जळगाव

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराच्या मान्यतेबाबत**

**संदर्भ :-** १) आपल्या महाविद्यालयाने / परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाचे नुतनीकरणासाठी / नैसर्गिक विस्तारासाठी [Continuation of Affiliation / Natural Growth] सादर केलेला प्रस्ताव.

२) विद्यापीठाद्वारे जा.क्र KBCNMU/05/ Nutani-NG-2022-23/D.O. 5/ 163/ 2022 दि. 16-06-2022 रोजी नियुक्त करण्यांत आलेली स्थानिक तपासणी समिती

महोदय /महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास मान्यता मिळणेकरिता आपण विद्यापीठास संदर्भिय पत्र क्रमांक ०१ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयासंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाद्वारे संदर्भिय पत्र क्रमांक ०२ अन्वये स्थानिक तपासणी समितीची नियुक्त करण्यांत आली होती.

सदर स्थानिक तपासणी समितीने आपल्या महाविद्यालयास/मान्यताप्राप्त परिसंस्थेस भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालाची, प्राप्त आदेशान्वये, मा. अधिष्ठाता / मंडळाने छाननी व तपासणी करून संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार व विद्यार्थी प्रवेशा संदर्भात शिफारशी करून सदर अहवालास मा. कुलगुरू महोदयांनी मा. विद्यापरीषदेच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे त्या अनुषंगाने, सोबतच्या तक्त्यात नमूद केलेल्या विषय/अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास [ Continuation of Affiliation / Natural Growth ] त्यासमोर दर्शविलेल्या कालावधीकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम,२०१६ चे कलम ११४(१) नुसार मान्यता देण्यांत येत आहे.

**आपल्या महाविद्यालयास देण्यांत येत असलेली मान्यता ही फक्त एका शैक्षणिक वर्षाकरिता म्हणजेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता देण्यांत येत असून सदर मान्यतेचे वेळोवेळी नुतनीकरण करणे आपणांस बंधनकारक राहील.**

आपणांस असेही विदीत करणेत येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०८ नुसार संलग्नीकरणासाठी विद्यापीठाने सूचित केलेल्या अटी/त्रुटींची पूर्तता करणे आपणांस बंधनकारक असून, त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या महाविद्यालयसंदर्भात / मान्यताप्राप्त परिसंस्थेससंदर्भात नमूद केलेल्या अटी/त्रुटींचे अवलोकन करून सदरच्या अटी/त्रुटींची परिपूर्ण स्वरूपात पूर्तता करावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह अटीपूर्तता अहवाल ०३ महिन्यात, तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी विद्यापीठाच्या संलग्नता विभागास सादर होईल अशा बेताने पाठवावा. आपण सदर मुदतीत अटी-पूर्तता अहवाल सादर न केल्यास, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिताचे कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

तथापि, ज्या महाविद्यालयांना सोबतच्या तक्त्यात प्रथम वर्ष व/थेट द्वितीय वर्षाकरीता No Admission असे नमूद केलेले असेल अशा महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता फक्त संलग्नीकरणाचे नुतनीकरणास/नैसर्गिक विस्तारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. अशा महाविद्यालयांनी प्रथम वर्षासाठी आणि थेट द्वितीय वर्षासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नयेत तथापि, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक व शिक्षक नियुक्तीसंदर्भात आणि स्थानिक चौकशी समितीने नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याबाबत रू. १००/- च्या गैरन्यायिक स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले हमीपत्र सादर करण्यासह, रिक्त पदांच्या नियुक्तीसाठी पुरेसे प्रयत्न केल्याबाबतचे अनुषंगिक दस्ताऐवज सादर केल्यास व त्यास अनुसरून विद्यार्थी प्रवेशास परवानगी मिळणेसंदर्भात विद्यापीठास प्रस्ताव सादर केल्यास विद्यार्थी प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल. मात्र विद्यापीठाच्या अंतिम मान्यतेनंतरच विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे आहे.

तसेच ज्या संबंधीत महाविद्यालयांच्या केसेस अद्याप मे. कोर्टात प्रलंबीत आहेत, अशा महाविद्यालयांच्या बाबतीत मे. कोर्टाच्या आदेशाच्या अधीन राहून कार्यवाही करण्यांत येईल, याचीही कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

महाविद्यालयास NAAC/NBA करणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी उपरोक्तबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी, हि विनंती.

म.कळावे,

आपला विश्वासू,

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

सोबत :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता.

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव :-

१) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२) मा. शिक्षण संचालक,उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१
३) मा. सह संचालक, उच्च शिक्षण, पहिला मजला जीवन प्राधिकरण भवन, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जळगांव
४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौ उ.म.वि., जळगांव.
५) मा.उप/सहा.कुलसचिव, संबंधितविद्याशाखा, परीक्षाविभाग, कबचौ उ.म.वि.जळगांव
६) मा. संगणक विभाग प्रमुख, संगणक विभाग, कबचौ उ.म.वि., जळगांव
७) मा. सहाय्यक कुलसचिव/कक्षाधिकारी, प्रवेश पात्रता व अभ्यासमंडळ विभाग, कबचौ उमवि, जळगांव
८) मा. समन्वयक, ई सुविधा केंद्र, कबचौ उमवि, जळगांव

जा.क्र. कबचौउमवि/५/नुतनीकरण-२०२२-२३/ डी.ओ. 5/ 234/२०२२, दिनांक : 04-08-2022 चे सहपत्र

**शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाच्या नुतनीकरण / नैसर्गिक विस्ताराचा तक्ता**

| Name of College | Details of Additional Division for Nutanikaran for A.Y 2022-23 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Nutanikaran for A.Y 2022-23 [As per Proposal] | Details of Courses/Subjects for Natural Growth for A.Y 2022-23 [As per Proposal] | A] Observations of Present LIC B] Conditions of Previous LIC C] Conditions of Present LIC | Approval of University to Continuation of Affiliation / Natural Growth for A.Y 2022-23 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 02 | 03 | 04 | 05 | 06 |
| [E130021] - RASHTRIYA SAHAKARI SHIKSHAN MANDLACHE,NANASAHEB YASHVANTRAV NARAYANRAO CHVHAN ARTS,COMMERCE AND SCIENCE COLLEGE CHALISGAON<br>Tal. Chalisgaon Dist. Jalgaon | B.SC. - Second Year - 2-100<br>B.SC. - Third Year - 2-100 | **B.SC. - First Year -** [MICROBIOLOGY - General] [INFORMATION TECHNOLOGY - General]<br><br>**B.SC. - Second Year -** [MICROBIOLOGY - General] [INFORMATION TECHNOLOGY - General]<br><br>**B.SC. - Third Year -** [MICROBIOLOGY - Special] [INFORMATION TECHNOLOGY - | | A] Physical infrastructure and facilities for the students and staff are sufficient. Classrooms are sufficient and many classrooms are equipped with IT facilities. Laboratories are also well equipped. However, washrooms | सदर पत्रात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची ०३ महिन्यांच्या आत तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता संलग्नीकरणाच्या नूतनीकरणाचे प्रस्ताव सादर करणेपूर्वी, पूर्तता करण्याच्या अधीन राहून संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास/ नैसर्गिक विस्तारास |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Special]<br><br>**M.SC. (BOTANY) - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.SC. (BOTANY) - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.SC. (COMPUTER SCI.) - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.SC. (COMPUTER SCI.) - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.SC. (ZOOLOGY) - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.SC. (ZOOLOGY) - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.C.A. - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.C.A. - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.C.A. - Third Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.M.S. (E-COM.) - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.M.S. (E-COM.) - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.M.S. (E-COM.) - Third Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.M.S. (Computer Management) - First Year** - AS PER SYLLABUS<br><br>**M.M.S. (Computer Management) - Second Year** - AS PER SYLLABUS<br><br>**B.A. - First Year** - [COMPUTER | | for the students and staff were not clean. Girls common-room was being used for examination related work.<br><br>B] --<br><br>C] 1. At least 10 new computers with latest specifications should be added to the computer laboratories. 2. The Girls common room should not be used for any other purpose and it should be always available to the girls. 3. Cleanliness of the washrooms for the students and staff must be maintained. 4. Depending on the workload and need, teachers for every PG and UG courses listed in the proposal for Nutanikaran for year 2022-23 should be appointed as per the University rules. 5. Additional Books for all the subjects with total costing about Rs 20,000/- should be | शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या एका वर्षाकरिता मान्यता प्रदान करण्यात येत आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | APPLICATION - General]<br><br>**B.A. - Second Year -** [COMPUTER APPLICATION - General]<br><br>**B.A. - Third Year -** [COMPUTER APPLICATION - General]<br><br>**M.A. (GEOGRAPHY) - First Year -** AS PER SYLLABUS<br><br>**M.A. (GEOGRAPHY) - Second Year -** AS PER SYLLABUS | | purchased for the Library. 6. The post of Librarian and Physical Director should be filled at earliest. | |

(ग. ना. पवार)
उपकुलसचिव
संलग्नता विभाग

**PRINCIPAL**
**NANASAHEB Y. N. CHAVAN**
**Arts, Science & Commerce College**
**Chalisgaon Dist. Jalgaon**